**कृपया प्रकाशनार्थ**

मुंबई – बुधवार दि.९ जुलै २००८

**<u>७/११ मुंबई बॉम्बस्फोट सरकारी दहशतवाद – किरीट सोमैया</u>**

**<u>नुकसान भरपाईच्या रक्कम (Compensation) विरोधात</u>**
**<u>रेल्वेचे उच्च न्यायालयात अपील</u>**

मुंबईतील १,०८१ बॉम्बस्फोटग्रस्तांच्या यातनांचा अजुन अंत झालेला नाही. त्यांना मिळालेल्या आर्थिक नुकसान भरपाईच्या विरोधात आता रेल्वे व केंद्र सरकारने उच्च न्यायालयात दावा दाखल केला आहे. बॉम्बस्फोटात बळी पडलेल्या ७११ जणांच्या विरोधात ७११ अपील / दावे दाखल करण्यात आले आहेत. हा 'सरकारी दहशतवाद' असल्याची प्रतिक्रिया डॉ.किरीट सोमैया यांनी दिली आहे. हे दावे आर्थिक नुकसान भरपाईचे आदेश 'रेल्वे क्लेम ट्रिब्युनलने' दिले आहेत.

केंद्र सरकारच्या वतीने रेल्वेने मुंबई उच्च न्यायालयात या आदेशच्या विरोधात धाव घेतली आहे. बॉम्बस्फोटात बळी गेलेल्यांना अधिक पैसा देण्यात आला, याच्या विरोधात रेल्वेने दावा दाखल केला आहे.

११ जुलै २००६ रोजी झालेल्या या दुर्घटनेला आता दोन वर्ष पूर्ण झाली असून रेल्वे, केंद्र सरकार व राज्य सरकारने १,०८१ अपघातग्रस्तांना दिलेल्या सर्व आश्वासनांची पूर्तता केलेली नाही. मानव अधिकार आयोगाने राज्य सरकार व रेल्वेला नोटीसा देऊन यासंबंधी पूर्तता करण्याचे आदेशही नुकतेच दिले आहेत.

या दुघटनेच्या दुस–या स्मृती दिनाच्यावेळी अशाप्रकारे उच्च न्यायालयात हजर राहण्याचे नोटीस हातात पडल्यामुळे बॉम्बस्फोटात बळी पडलेल्या लोकांमध्ये भितीचे व चीड निर्माण करणारे वातावरण निर्माण झाले आहे. सुनावणीच्यावेळी बॉम्बस्फोटग्रस्त उपस्थित न राहिल्यास निकाल 'तुमच्या परोक्ष एकतफी करण्यात येईल' अशा नोटीसा त्यांना मिळाल्या आहेत. अजुन अनेकांवर वैद्यकीय उपचार सुरु आहेत, शस्त्रक्रियाही करावयाच्या आहेत. अशावेळी या नोटीसा म्हणजे मानवतेची क्रूर चेष्टाच आहे.

राजन कांबळे, भाईंदर यांना २८,०००/– रुपयांची (Compensation) नुकसान भरपाई मिळाली त्यांना नोटीस मिळाली. कालिना येथील श्रीमती कुंदा विठोबा शिंदे यांना फक्त १०,०००/– रुपये २७ फेब्रुवारी २००८ रोजी देण्यात आले त्यांनाही नोटीस मिळाली. रामनिवास लठ्ठा यांना २ एप्रिल २००८ रोजी १०,०००/– रुपये आणि आता न्यायालयात हजर राहण्याचे नोटीस.

दहशतवादाने त्रस्त व वैद्यकिय उपचारांनी ग्रस्त अशा लोकांना किंचित मोबदला जास्त दिला गेला किंवा ५०० रु. व्याज अधिक दिले गेले त्यासाठी न्यायालयात खेचणे यात सरकारी अधिका–यांच्या अकलेची दिवाळखोरी दिसते.

वास्तविकरित्या या अपघातग्रस्तांना नुकसान भरपाई 'रेल्वे क्लेम ट्रिब्युनल' देते ती जनरल इन्शुरन्स कंपनीकडून मिळते. प्रत्येक प्रवासी तिकिट किंवा पास घेतो त्यावेळी जनरल इन्शुरन्स अपघात विम्याचा प्रिमियमही वसूल केला जातो. अशा दुर्घटनांच्या वेळी 'रेल्वे क्लेम ट्रिब्युनल' व्दारे इन्शुरन्स कंपन्यांकडे ही व्यवस्था असते यात रेल्वेच्या खिशातून एकही पैसा जात नाही.

अधिक देण्यात आलेले (असा रेल्वेचा दावा आहे) रु.३८०, रु.८८२ ही रक्कम वसूल करण्यासाठी वकीलांची फी, लिगल चार्जेस अशी प्रत्येक सुनावणीसाठी कित्येक हजार रुपये खर्च हा रेल्वे व सरकारची दिवाळखोरी आहे.

डॉ.किरीट सोमैया यांनी सरकारने हे अपील मागे घेण्यात यावे अशी जाहीर मागणी केली आहे.

**प्रसिध्दी सचिव**